क्रमांक : संकीर्ण ८२२४/प्र.क्र.२२३/सांका ४


विकास खारगे, भा.प्र.से.
अपर मुख्य सचिव ( सांस्कृतिक कार्य )
महाराष्ट्र राज्य

Vikas Kharage, I.A.S.
Additional Chief Secretary
(Cultural Affairs)
Maharashtra State


08 AUG 2024

विषय :- **"हर घर तिरंगा" म्हणजेच "घरोघरी तिरंगा" या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत.**

नमस्कार,

मा. पंतप्रधान महोदय यांनी जाहीर केल्याप्रमाणे दिनांक ०९ ते १५ ऑगस्ट, २०२४ या कालावधीमध्ये "हर घर तिरंगा" म्हणजेच "घरोघरी तिरंगा" या कार्यक्रमाची अंमलबजावणी सर्व देशभर केली जाणार आहे. भारतीय जनतेमध्ये व विशेषत: नवीन पिढीच्या युवकांच्या मनामध्ये राष्ट्रभक्ती जागृत व्हावी व या राष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये जास्तीत जास्त जनतेने सक्रीय सहभाग घ्यावा, या करिता सदरचे अभियान राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्रात देखील हे अभियान अत्यंत उत्साहाने साजरे करावयाचे असून, या अभियानाला एक जन आंदोलनाचे स्वरुप द्यावयाचे आहे. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता आपण जे विविध कार्यक्रम दिनांक ०९ ते १५ ऑगस्ट, २०२४ या कालावधीमध्ये आपल्या जिल्हयामध्ये पार पाडणार आहात, तेथील सर्व प्रशासकीय यंत्रणेला योग्य ते मार्गदर्शन करावे. "हर घर तिरंगा" म्हणजेच "घरोघरी तिरंगा" या कार्यक्रमांतर्गत तिरंगा यात्रा, तिरंगा सांस्कृतिक कार्यक्रम (Concerts), तिरंगा मानवंदना (Tribute), तिरंगा प्रतिज्ञा, तिरंगा दौड (Marathon), तिरंगा कॅनव्हास (Canvas) असे विविध कार्यक्रम आपल्या जिल्हयामध्ये आयोजित करण्यात येणार आहेत. याबाबत स्वयंसेवी संस्था, शाळा, महाविद्यालय यांच्याशी संपर्क करून वरील बाबींसदर्भात आवश्यक ती कार्यवाही करावी.

दिनांक १३, १४ व १५ ऑगस्ट, २०२४ या तिनही दिवशी प्रत्येक घरोघरी तसेच दुकाने, खाजगी आस्थापना व सर्व शासकीय कार्यालयांच्या इमारतींवर राष्ट्रध्वज फडकविला जाईल याअनुषंगाने आपल्या कार्यक्षेत्रात जनजागृती करण्यात यावी. जिल्ह्यातील जनतेला सुलभ रितीने राष्ट्रध्वज उपलब्ध व्हावा, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना आपल्या स्तरावरून करण्यात याव्यात.


पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, द्वारा - मुख्यमंत्री सचिवालय, ६ वा मजला, मंत्रालय (मुख्य इमारत), मुंबई ४०० ०३२.
Tourism & Cultural Affairs Dept., C/o. Chief Minister's Secretariat, 6th Floor, Mantralaya (Main), Mumbai 400 032.
दूरध्वनी क्र. : +९१-२२-२२०२ १८५० Tel. No. : +91-22-2202 1850
+९१-२२-२२०२ ०५०० +91-22-2202 0500
**E-mail :** sec.cultural@maharashtra.gov.in

महाराष्ट्र हा प्रत्येक अभियानामध्ये देशपातळीवर नेहमीच आघाडीवर राहीलेला आहे. मागील २ वर्षांमधील आझादी का अमृत महोत्सव, मेरी माटी मेरा देश या अभियानांमध्ये आपल्या स्तरावरून केलेल्या उत्कृष्ठ कामगिरीमुळे केंद्र शासनाने नेहमीच महाराष्ट्राची प्रशंसा केलेली आहे.

दिनांक ०९ ते १५ ऑगस्ट, २०२४ या कालावधीमध्ये जे विविध उपक्रम राबविले जाणार आहेत, त्यांच्या अंमलबजावणीसाठी आपण योग्य त्या उपाययोजना करावी. दिनांक ०७.८.२०२४ रोजी VC द्वारे झालेल्या बैठकीमध्ये आपणांस सूचना दिलेल्या आहेत. यासंदर्भात तिरंगा सांस्कृतिक कार्यक्रम (Concerts) मधील तिरंगा गीत व तिरंगा कॅनव्हास (Canvas) या बाबी केंद्र शासनाच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घ्यावे. तसेच, मराठी भाषेत अनुवादीत केलेली तिरंगा प्रतिज्ञा सोबत जोडली आहे. त्याबरोबर कार्यक्रमाच्या अनुषंगाने केंद्र शासनास सादर करावयाची सांख्यिकी माहिती जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर संकलित करून एकत्रितरित्या केंद्र व राज्य शासनास सादर करावी. त्याचा विहीत केलेला नमूना सोबत जोडला आहे.

आपला,

(विकास खारगे)

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व)

# “हर घर तिरंगा”

शासनास सादर करावयाच्या अहवालाचे विवरणपत्र

**जिल्हा :-**

| **विवरण** | **संख्या** |
|---|---|
| तिरंगा यात्रा संख्या | |
| तिरंगा रॅलीज् संख्या<br>(सायकल/मोटर सायकल/कार) | |
| संपन्न झालेल्या तिरंगा मेळा संख्या | |
| तिरंगा प्रतिज्ञा कार्यक्रम संख्या | |
| सेल्फीज् अपलोड संख्या | |
| तिरंगा कॅनव्हास स्वाक्षऱ्या संख्या | |

**********************************

# “तिरंगा प्रतिज्ञा”

मी शपथ घेतो/घेते की, मी आपला तिरंगा ध्वज फडकवेन. स्वातंत्र्य  सैनिक व वीर हुतात्मे यांच्या भावनेचा सन्मान करेन आणि भारताच्या विकास आणि प्रगती साठी स्वतःला समर्पित करेन.

****************************